'बेस्ट'चे 'कोरोना योद्धे' उपाशी

सहा महिने 'कोविड'भत्ता थकीत

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी): 'कोविड'काळामध्ये प्राणाची बाजी लावून काम केलेल्या 'बेस्ट'च्या 'कोविड योद्ध्यां'ना गेल्या सहा महिन्यांपासून 'कोविड'भत्ता मिळालेला नाही. पगाराची मारामार असणाऱ्या 'बेस्ट' कर्मचाऱ्यांना 'कोविड'भत्ता मिळण्यासाठीही मारामार होते आहे. गेल्या सहा महिन्यांतील सुमारे ६० कोटी रुपयांचा 'कोविड'भत्ता थकीत असून कामगारांमध्ये याबाबत प्रचंड नाराजी असल्याचे दिसते आहे.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे सार्वजनिक वाहतूक सेवा बंद असूनदेखील यामध्ये कर्तव्यकठोर तीन हजार कर्मचाऱ्यांना कोरोनाचा संसर्ग झाला आणि सुमारे १२५ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. मात्र, कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर करू नये म्हणून त्यांना दररोज ३०० रुपये

'कोविड'भत्ता जाहीर करण्यात आला. सुरुवातीचे तीन महिने 'कोविड'भत्ता देण्यात आला. मात्र, त्यानंतर कर्मचाऱ्यांना 'कोविड'भत्ता देण्यात आला नाही.

कामगारांचे महिन्यातील कामाचे २० दिवस गृहीत धरले तर प्रत्येक कामगाराचे सहा हजार रुपये, याप्रमाणे सहा महिन्याचे ३६ हजार रुपये होतात. अशा प्रकारे २० हजार कामगारांची सहा महिन्यांची 'कोविड'भत्त्याची थकीत रक्कम ६० कोटींच्या पुढे जात आहे. 'कोविड' काळात 'बेस्ट' कामगार अविरत काम करून थकले असून, 'कोविड'भत्ता मागणी करून ते थकण्याची चिन्हे आहेत. याबाबत 'बेस्ट' प्रशासनाला कोणताही खेद वाटत नसल्याचे 'बेस्ट' समिती सदस्य सुनील गणाचार्य म्हणाले.

जूनमध्ये नियमांच्या अधीन राहून 'बेस्ट' बसेसमध्ये सर्वसामान्यांना प्रवेश मिळाला आणि गाड्या प्रवाशांनी भरून जाऊ लागल्या. म्हणजे 'लॉकडाऊन'मध्ये शिथिलता मिळाल्यानंतर नागरिकांवरील ताण कमी झाला असला, तरी 'बेस्ट' कर्मचाऱ्यांवरील कामाचा आणि चिंतेचा ताण वाढला. सर्वांसाठी लोकल अद्याप सुरू झाली नसल्याने ही संख्या दिवसाला २५ लाखांच्या पुढे गेली आहे. त्यामुळे चालक, कंडक्टर यांच्यावर कामाचा ताण कमी झालेला नाही. एकीकडे कोरोना वाढेल, या भीतीने उपनगरी रेल्वेमध्ये सर्वसामान्य नागरिकांना प्रवेश मिळत नाही. पण, 'बेस्ट' बसेस मात्र प्रवाशांनी भरभरून जात आहेत. 'बेस्ट' कर्मचारी त्यांच्या कामाशी प्रामाणिक आहेत. पण, प्रशासनाकडून मात्र उपेक्षित आहेत. त्यामुळेच जीवाची पर्वा न करता काम केलेल्या 'बेस्ट' कर्मचाऱ्यांचा 'कोविड'भत्ता थकविण्यात आला आहे. तो मिळण्याच्या प्रतीक्षेत कामगार आहेत.

या मावळ्यांचाही विचार करा

'कोस्टल रोड'मध्ये बोगदा खोदणाऱ्या 'मावळा' यंत्राचे उद्घाटन करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की, ''रणांगणात मावळा नसेल तर नेता असून चालत नाही. स्वराज्यात मावळ्यांचे स्थान महत्त्वाचे, तसेच विकासाच्या लढाईत मावळ्यांचे स्थानही महत्त्वाचे आहे.'' तोच धागा पकडून 'बेस्ट' समिती सदस्य भाजपचे सुनील गणाचार्य म्हणाले की, ''कोरोना काळात सर्व व्यवहार ठप्प असताना 'बेस्ट' कामगारांमुळे मुंबई सुरळीत आणि सुरक्षित राहिली. संकटकाळी प्राणपणाने लढणाऱ्या 'बेस्ट'च्या या मावळ्यांचाही विचार झाला पाहिजे. त्यांना जाहीर केलेला कोरोना भत्ता मिळाला पाहिजे, तो त्यांचा हक्क आहे.''

मुख्यमंत्र्यांकडून मिळकतींच्या माहितीची लपवाछपवी

सोमय्या यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी): मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मे २०२० मध्ये विधान परिषदेची निवडणूक लढवली. त्यावेळी त्यांनी नामांकन पत्रासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात मिळकत माहिती लपवली असल्याची तक्रार भाजप नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सोमवार, दि. ११ जानेवारी रोजी महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक आयुक्त बलदेव सिंग यांना भेटून केली.

यावेळी सोमय्या यांनी यासंदर्भात विविध पुरावेही सादर केले. ते म्हणाले, ''उद्धव ठाकरे यांनी ९ मे, २०२० रोजी केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी अन्वय नाईक यांच्याकडून गाव कोलई तालुका मुरूड येथील जमीन व त्यावरील १९ बंगले विकत घेतले होते. २१ मार्च, २०१४ रोजी हा करार झाला होता. त्याचे 'रजिस्ट्रेशन' ठाकरेंनी केले होते. परंतु, मिळकतीत कुठेही

त्यावरील १९ बंगले ज्याचे एकंदर बांधकाम २३,५०० स्क्वेअर फूट आणि रेडिरेकनरप्रमाणे किंमत मे २०२० रोजी ५ कोटी, २९ लाख होती, त्याची नोंद नाही,'' असे सोमय्या म्हणाले. ते पुढे म्हणाले की, ''मुख्यमंत्री यांनी आपल्या प्रतिज्ञापत्रात पत्नी रश्मी ठाकरे यांच्या नावाने कोलई येथील जमीन दाखवली. परंतु, त्यावरील १९ बंगले दाखवले नाही. अलिबाग येथील ही जागा रश्मी ठाकरे यांनी अन्वय नाईक परिवाराकडून विकत घेतली. त्यावरील १९ बंगल्यांची त्यांना पूर्ण कल्पना आणि माहिती होती. तरीही रश्मी उद्धव ठाकरे यांनी ३१ मार्च, २०२१ पर्यंत कोलई ग्रामपंचयतीला घरपट्टी, पाणीपट्टी व वीजदेयक इत्यादी कर भरले असल्याच्या पावत्यासुद्धा सोमय्या यांनी निवडणूक आयोगाला पुरावे म्हणून दिले आहेत. या जमिनी व त्यावरील घरे, रश्मी उद्धव ठाकरे व मनीषा रवींद्र वायकर यांच्या नावाने ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डमध्ये दिसत आहेत. निवडणूक प्रतिज्ञापत्रात उद्धव ठाकरे यांनी आपल्या पत्नीची मिळकत घरे/बंगले लपवले असल्याचे या कागदपत्रांवरून सिद्ध होत आहे, यावर निवडणूक आयोगाने योग्य कारवाई करावी,'' अशी मागणी सोमय्या यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

कार्यक्रमांनी कोणी जवळ येत नाही, कृतीतून लोक जवळ येतात

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांचा 'शिवसेने'ला टोला

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी): शिवसेनेने आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने गुजराती समाजाला जवळ करण्यासाठी 'गुजराती मेळावा' आयोजित केला. शिवसेना मतांसाठी हे सर्व करत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. यासंदर्भात सोमवार, दि. ११ जानेवारी रोजी विरोधी पक्षनेते माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, ''एकीकडे अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनला शिवसेना कडाडून विरोध करतेय आणि दुसरीकडे गुजराती समाजाला जवळ घेऊ म्हणतेय. अशा कार्यक्रमांनी कोणी जवळ येत नाही. कृतीतून लोक जवळ येतात, असा निशाणा त्यांनी लोणावळा येथील पत्रकार परिषदेत शिवसेनेवर साधला.

फडणवीस म्हणाले की, ''गुजराती भाषकांचे सोडाच, निवडणुकीसाठी शिवसेनेने हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना 'जनाब' बाळासाहेब ठाकरे केले आहे. शिवसेनेची कॅलेंडरही आता उर्दू भाषेत निघत आहेत. निवडणुकीच्या निमित्ताने ही शिवसेनेची नौटंकी सुरू आहे. हे सगळे कशासाठी सुरू आहे हे लोकांनाही कळते आहे.''

नेहरूंनी केलेली कामे निस्तारण्यासाठीच जनतेचे मोदींना समर्थन

अतुल भातखळकर यांचे प्रत्युत्तर



मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी): ''नेहरूंनी केलेली कामे निस्तारण्यासाठीच जनतेने मोदींना दुसऱ्यांदा प्रचंड समर्थन देऊन पंतप्रधान बनवले आहे,'' अशी खोचक टीका आ. अतुल भातखळकर यांनी सोमवार, दि. ११ जानेवारी रोजी केली. 'सामना'तून केंद्र सरकारवर भंडारा येथील घटनेसंदर्भात केलेल्या टीकेस त्यांनी प्रत्युत्तर दिले.

भंडारा येथील दुर्घटनेबाबत केंद्र सरकारने दुःख व्यक्त केले असता, ''दुःख व्यक्त करून काय होणार? थोडे राजकारण कमी करा, निवडणुकांवरील उधळपट्टी थांबवा आणि पंडित नेहरूंच्या काळात आरोग्य व्यवस्थेवर जसे काम झाले तसे करा,'' अशी शिवसेनेकडून 'सामना'तून खोचक टीका मोदी सरकारवर करण्यात आली. यावर असे प्रत्युत्तर भाजप नेते व प्रवक्ते अतुल भातखळकर यांनी दिले आहे.

ते म्हणाले की, ''नेहरूंनी केलेली कामे निस्तारण्यासाठीच जनतेने मोदींना दुसऱ्यांदा प्रचंड समर्थन देऊन पंतप्रधान बनवले आहे. संजय राऊतांसारख्या बोरूबहाद्दरांच्या मतांना पंतप्रधान नरेंद्र मोदी किंमत देत नाहीत हे देशाचे भाग्य आहे. इतिहास साक्षी आहे की, ज्या पत्रकारांनी वैयक्तिक आकस आणि द्वेषातून मोदींचा विरोध केला, त्यांचा जनतेने बाजार उठवला. नरेंद्र मोदी दुसऱ्यांदा पंतप्रधान झाले आणि जनता जनार्दनाची सेवा करून तिसऱ्या वेळेसही होतील. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे अगदीच लक्ष देत नसतील, तर संजय राऊतांनी राहुल गांधींना सल्ले द्यावेत. मोदीद्वेषाचा कॉमन फॅक्टर आहेच, शिवाय दोघांचे विचार आणि वैचारिक उंची सारखीच आहे.''

'कोस्टल रोड' वेळेआधीच पूर्ण होणार

मुख्यमंत्र्यांचा विश्वास

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी): ''कोरोनामध्ये काम मंदावून देता, मुंबईकरांची वाहतूककोंडीतून सुटका करणारा महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेला 'कोस्टल रोड' वेळेआधीच पूर्ण होणार,'' असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवार, दि. ११ जानेवारी रोजी व्यक्त केला. प्रिन्सेस स्ट्रीट ते प्रियदर्शनी पार्क दरम्यान १०.८ किमी. लांबीच्या 'कोस्टल रोड'मध्ये दोन बोगदे असून, त्यांचे खोदकाम करणाऱ्या 'मावळा' यंत्राचे उद्घाटन सोमवारी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्यमंत्री म्हणाले की, ''कोरोनाच्या लढाईत मुंबई पालिकेने जगाने दखल घ्यावी, असे काम केले. मुंबईकरांच्या विकासाच्या लढाईमध्ये आपण असे पुढे राहू. या लढाईत अनेक मावळ्यांची कामगिरी महत्त्वाची ठरेल. मुंबईच्या विकासासाठी जगात उपलब्ध असलेले सर्वोत्तम असे तंत्रज्ञान, विज्ञान आणण्याची आपली परंपरा आहे. यापुढेही ही परंपरा अशीच चालू राहील.''

''कोणतेही काम पुढे नेताना केवळ नेता असून भागत नाही. त्यासाठी लढवय्या मावळ्यांची गरज असते. रणांगणात मावळाच लढत असतो. तसे या मुंबई महापालिकेच्या या कामात आयुक्तांपासून ते वरिष्ठ अधिकारी, तज्ज्ञ, हे काम करणारी कंपनी, अभियंते, कर्मचारी हे सगळेच असे मावळे आहेत.

१९९५-९९ मध्ये युती सरकारच्या काळात वाहतुकीची समस्या जाणवू लागताच आपण मुंबईत ५५ उड्डाणपूल उभे केले. आता तेही पूल कमी पडायला लागले आहेत. उपनगरातील जनतेला थेट शहरात यायला आता हा समुद्रीमार्ग उपयुक्त ठरणार आहे. मुळात या समुद्रीमार्गात भुयारी मार्गाच मोठ्या लांबीचा आहे. हा भुयारी मार्ग थेट मलबार हिल खालून, गिरगाव चौपाटीवर निघणार आहे. हे काम लवकर म्हणजे नियोजित वेळेच्या आधीच पूर्ण होईल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार अजोय मेहता, महापालिका आयुक्त इकबालसिंग चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे आणि अधिकारी उपस्थित होते.

दोन्ही बोगदे १८ महिन्यांत पूर्ण होणार

आयुक्त इकबालसिंग चहल म्हणाले की, ''प्रियदर्शनी ते गिरगाव चौपाटी यादरम्यान **दोन** बोगदे असून, जून २०२२ पर्यंत १८ महिन्यांत पूर्ण करण्यात येणार आहेत. पहिला बोगदा ऑगस्ट २०२१ मध्ये, तर दुसरा बोगदा जून २२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सागरी महामार्गासाठी १३ हजार कोटी रुपये खर्च करणारी मुंबई ही देशातील पहिली महापालिका आहे.''

अश्विनी भिडे यांनी वाढवला नारळ

'मावळा' मशीनच्या उद्घाटन सोहळ्याचा नारळ वाढविण्याचा मान अतिरिक्त महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना मिळाला. मेट्रोसारखे प्रकल्प योग्य मार्गाने नेण्यात भिडे यांची ख्याती आहे. त्यामुळे अशा आव्हानात्मक प्रकल्पाचा उद्घाटनाचा नारळ वाढविण्याचा मान योग्य व्यक्तीला मिळाला, असे बोलले जात होते.

असे आहे 'मावळा' मशीन

बोगदा खणणारे मावळा मशीन (टीबीएम) हे या प्रकल्पातील महत्त्वाचे साधन आहे. हे मशीन १२.१९ मीटर व्यासाचे आहे. हे भारतातील आतापर्यंतचे सर्वात मोठ्या व्यासाचे 'टीबीएम' मशीन आहे. बोगद्याचा तयार केलेला व्यास ११ मीटर असून बोगद्यात सर्व सुरक्षेची व्यवस्था असेल. अरबी समुद्राखालील तब्बल १७५ एकर जमिनीवर भराव टाकण्यात आला आहे. तर अजून १०२ एकर समुद्राखालील जमिनीवर भराव टाकण्यात येणार आहे. इतकेच नाही, तर या मार्गावर समुद्राखालून ४०० मीटरचे बोगदे असतील. हे बोगदे खोदण्यासाठी 'मावळा' हे मशीन आणले आहे. बोगद्यातील खडक कापण्यास हे मशीन उपयुक्त आहे. ''खडक जेवढा कठीण तेवढे काम 'मावळा' अधिक चांगले करतो,'' असे विशाल ठोंबरे यांनी सांगितले.

मराठा संघटना आक्रमक; न्याय दिल्याशिवाय पोलीस भरती नको

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी): काही महिन्यांपूर्वी राज्यातील पोलीस भरतीबाबतचा निर्णय करण्यात आला. मात्र, उमेदवारांमध्ये भरतीच्या तारखेबाबत उत्सुकता होती. अखेर सोमवार, दि. ११ जानेवारी रोजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी राज्यातील १२,५३८ पोलीस पदांची भरती लवकर करण्यात येईल व तिच्या भरती प्रक्रियेबाबत घोषणा केली. मात्र, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत भरती नको; अन्यथा आम्ही निर्णय घेऊ, असा सरकारच्या घोषणेवर मराठा समन्वयकांनी आक्षेप घेत सरकारला इशारा दिला.

गृहमंत्री अनिल देशमुख यांनी राज्यात पहिल्या टप्प्यात ५,३०० जागांसाठी पोलीस भरतीबाबत जाहिरात निघणार असल्याची नागपूर येथून घोषणा केली. पोलीस खात्यामध्ये १२,५३८ जागांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. उर्वरित जागा दुसऱ्या टप्प्यामध्ये भरल्या जाणार असून १२,५३८ जागा भरल्यानंतरही गरज असल्यास पोलीस खात्यामध्ये जादाची भरती केली जाईल, असेही देशमुखांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी राज्य सरकारकडून 'एसईबीसी'च्या आरक्षणाशिवाय राज्यातील पोलीस भरतीची प्रक्रिया पार पाडण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. यापूर्वी निर्णयाला मराठा संघटनांकडून तीव्र विरोध करण्यात आल्याने पोलीस भरतीची प्रक्रिया वादाच्या भोवऱ्यात होती. येत्या २५ जानेवारीला कोर्टामध्ये मराठा आरक्षणावर सुनावणी होणार असून तोपर्यंत कोणतीही भरती न करण्याचे मराठा संघटना व विद्यार्थी यांनी म्हटले होते. मात्र, अनिल देशमुख यांनी पोलीस भरती प्रक्रिया पार पाडली जाणार असल्याचे आज जाहीर केल्याने मराठा विद्यार्थी व मराठा संघटनांच्या समन्वयकांनी या निर्णयांबाबत तीव्र विरोध दर्शविला आहे.

> पोलीस भरती थांबविली नाही, तर मराठा समाजाचा आक्रोश रस्त्यावर दिसेल. मराठा समाजातील विद्यार्थ्यांना कोणत्या प्रवर्गांतून पदभरती देताय हे सांगा. वेळोवेळी समाजाची दिशाभूल करू नका. जोपर्यंत मराठा समाजाचा आरक्षणाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत सदर भरती प्रक्रिया नको, नाहीतर आम्ही निर्णय घेऊ.
>
> – **आबा पाटील,** समन्वयक, मराठा क्रांती मोर्चा

जाहीर नोटीस

याद्वारे नोटीस देण्यात येते की, **गांव मौजे विरार प., तालुका : वसई, जिल्हा : पालघर** येथील **विनय पॅलेस को-ऑप. हौ.सो.लि.,** मधील **शॉप नं. १** असा शॉप **श्री. मनोज चंदनमल जैन** यांचे मालकीचा असून सदर शॉपचे ओरीजनल शेअर सर्टिफिकेट नं. ६१, भाग ६०१ ते ६१० गहाळ झालेले आहे व आता त्यांना ड्युप्लीकेट शेअर सर्टिफिकेट हवे आहे तरी त्यांच्या नावांने ड्युप्लीकेट शेअर सर्टिफिकेट देण्याबाबत कोणाचाही काहीही हरकत असल्यास त्यांनी निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या **१११, पहिला मजला, कपाडीया हाऊस, गावठण, विरार (प), ता. वसई, जि. पालघर** येथील कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून **१४ दिवसाचें** आंत सर्व कागदपत्रासहित लेखी कळवावे अन्यथा त्यांना मागणीनुसार ड्युप्लीकेट शेअर सर्टिफिकेट देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सही/-
आर.टी. पाठक
(वकील)

स्थळः विरार दिनांकः १२.०१.२०२१

VINYL CHEMICALS (INDIA) LIMITED
CIN: L24100MH1986PLC039837
Regd. Office: Regent Chambers, 7th Floor, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021. **Tel:** 2282 2708; **Fax:** 2204 3969
Website: www.vinylchemicals.com

NOTICE

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47(1) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Monday, 25th January, 2021, to consider and take on record, inter alia, the Unaudited Financial Results for the third quarter and 9 months ended 31st December, 2020.

The information contained in this notice is also available on the Company's website www.vinylchemicals.com and also on the website of the BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com.

for Vinyl Chemicals (India) Ltd.
P.C.Patel
Secretary

Place : Mumbai
Date : 12/01/2021

मुंबईवर संकटांची मालिका कायम

'कोरोना'पाठोपाठ धोका 'बर्ड फ्लू'चा

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी): जागतिक महामारी ठरलेल्या कोरोनाने मुंबईसह राज्यभरात थैमान घातल्यानंतर, आता 'बर्ड फ्लू'च्या आजाराने मुंबईसह राज्यभरात शिरकाव केला आहे. मृत आढळलेल्या कावळ्यांचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले असता, त्यांचा अहवाल 'पॉझिटिव्ह' आला आहे. राज्याच्या काही भागात मोठ्या प्रमाणात कोंबड्यांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना मुंबईतही चेंबुरच्या टाटा कॉलनीत नऊ व गिरगाव येथील बालोद्यानात १२ कावळ्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पालिका प्रशासन अलर्ट झाले. या मृत कावळ्यांचे नमुने राज्याच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत पुण्याच्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले. त्यांचे चाचणी अहवाल 'पॉझिटिव्ह' असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे मुंबईकर चिंतातुर झाले आहेत. लातूर, परभणीत शेकडो कोंबड्यांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर आता मुंबईतही 'बर्ड फ्लू'चा धोका असल्याने प्रशासनाची धावपळ उडाली आहे.

कोंबडी व्यवसाय पुन्हा धोक्यात

जगभरात कोरोनाचा संसर्ग सुरू झाल्यानंतर तो कोंबड्यांमुळे होत आहे, असे समजून अनेकांनी चिकन आणि अंडे खाणे बंद केले. त्यामुळे कुक्कुटपालन आणि चिकन व्यवसाय धोक्यात आला. त्यानंतर कोरोना आजाराचा कोंबड्यांशी काही संबंध नाही, हे स्पष्ट झाले. तोपर्यंत कोरोनाने मुंबईत शिरकाव केला आणि सारे व्यवहार ठप्प झाले. आता कोरोना संसर्गाचे प्रमाण कमी होत असून सारे काही सुरळीत होण्याच्या प्रयत्नात असताना 'बर्ड फ्लू'ने शिरकाव केला आहे. त्यामुळे वर्षभरात दुसऱ्यांदा पोल्ट्री व्यवसायावर संक्रांत आली आहे.

ग्राहकांची दुकानांकडे पाठ

मुंबईसह राज्यभरात 'बर्ड फ्लू'ने शिरकाव करताच अनेकांनी चिकन आणि अंड्यांच्या दुकानांकडे पाठ फिरविली आहे. ग्राहकांची मागणी नसल्याने चिकन आणि अंड्यांचे भाव गडगडले आहेत. रविवार हा मुंबईकरांचा मांसाहाराचा खास वार असतो. या दिवशी मटण आणि चिकनच्या दुकानांपुढे रांगा लागतात. मात्र, मागील रविवारी चिकन आणि अंडी खरेदी करणाऱ्यांची संख्या रोडावल्याने अंड्यांच्या दरामध्ये घसरण झालेली आहे.

धोका नाही. पण, काळजी घ्या

'''बर्ड फ्लू'मुळे माणसांना धोका नाही, तरीही काळजी घेणे आवश्यक आहे. कच्चा मांसाहार करू नये. मटण, चिकन, अंडी चांगली शिजवून खाणे आवश्यक आहे,'' असे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगला गोमारे यांनी केले आहे.

मृत कावळ्यांचे नमुने 'पॉझिटिव्ह'

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे- ५. दूरध्वनी क्र. : २५५०११४५, २५५०११४१
निविदा प्रक्रिया कक्ष

जाहिरात क्र. २/६३९ दिनांक : ११/०१/२०२१

निविदा जाहिरात - नवीन कामे

१) ई-निविदा विक्री कालावधी दिनांक : १२/०१/२०२१ ते ०२/०२/२०२१ दुपारी २.३० पर्यंत
२) निविदा स्वीकृती अंतिम दिनांक व वेळ : १२/०१/२०२१ ते ०२/०२/२०२१ दुपारी २.३० पर्यंत
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक : ०३/०२/२०२१ (शक्य झाल्यास) दुपारी ३.०० वा.

अ. क्र.	निविदा क्र.	खात्याचे नाव	कामाचे नाव	एकूण निविदा रक्कम	बयाणा रक्कम	कामाची मुदत (दिवस)	निविदा संच रुपये
१	पी.एम.सी./भवन/६७/२०२०-२१	भवन रचना विभाग	प्रभाग क्र. २ धानोरी स.नं. ३६ येथील लाईट हाऊस व स्पर्धा परीक्षा केंद्राच्या इमारतीचे पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे बांधकाम करणे.	१,९४,१०,२८३.००	२,२०,२५०.००	१२ महिने	११९७९
२	पी.एम.सी./भवन/७०/२०२०-२१	भवन रचना विभाग	प्रभाग क्र. १५अ मध्ये कवठी अड्डा, सदाशिव पेठ येथे क्रीडासंकुल उभारणे.	१,५५,५८,५१५.२०	१,७५,६५०.००	१२ महिने	११९७९

अ) पुणे म.न.पा.ची वरील कामे ही अनुभवी/म.न.पा. मान्यताप्राप्त/शासन मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेटमध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच **https://mahatenders.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास, स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
ड) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती भवन विभाग, पुणे मनपा येथे मिळेल.
ई) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ(वि)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फत स्वीकारणेत येणार आहे.

स्वाक्षरी/-
(शिवाजी लंके)
प्र. अधीक्षक अभियंता
भवन रचना कार्यालय